महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा

# विभागीय आरोग्य व कुटुंबकल्याणप्रशिक्षणकेंद्र, छत्रपतीसंभाजीनगर

एन-५, कॅनॉटपरिसर, चिस्तीयापोलीसचौकीजवळ, छत्रपतीसंभाजीनगर- ४३१००१

दुरध्वनी :-(०२४०) २४८५३४५
वस्तीगृह :-(०२४०) २४८६३८३
E – Mail :- hfwtcabd@gmail.com


जा.क्र./आवकुकप्रकेंछसंन/भांडार/वा.भा.द.क./४७३४/२०२५
दि.२१.०९.२०२६.
Location Link:- https://maps.app.goo.gl/anJHRcAVKLRR9Jd28

जाहिरात

विषय :- दरपत्रके संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

**आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत मराठवाडयातील आठ जिल्हयामध्य व काही वेळा महाराष्ट्रातील काही ठिकाणी आढावा बैठक, प्रशिक्षण, संनियंत्रणास व इतर कामानिमीत्त जाणे व येणेकरीता खाजगी वाहन ऑन कॉल भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. वाहन व्यवस्था करणाऱ्या वाहन पुरवठादार/व्यावसाईक यांच्याकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.** तरी वाहन व्यवस्था करणाऱ्या नोंदणीकृत वाहन पुरवठादारा/व्यावसाईक यांचेकडून खालील बार्बीनुसार (A.C.On Call Basis Non A.C. On Call Basis A.C.Monthly Basis & Non A.C.Monthly Basis) भाडेतत्वावर घेण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | आसन क्षमता | जिल्हा अंतर्गत एक दिवसाचे ३०० किमी मर्यादेत भाडे | दर प्रति कि.मी. | एक महिना ३००० किमी करीता सर्व करांसहीत |
|---|---|---|---|---|---|
| १ | टोयाटो इनोव्हा क्रिस्टा | ०७ | | | |
| २ | टाटा सुमो, बोलेरो इ. | ०७ | | | |
| ३ | स्विफ्ट डिझायर/ईटीओस इ | ०५ | | | |
| ४ | बोलेरो पिकअप व्हॅन इ. | ०२ | | | |
| ५ | मिनी बस | १७ | | | |
| ६ | मिनी बस | २२ | | | |
| ७ | मिनी बस | ३० | | | |
| ८ | मिनी बस | ५० | | | |

वरील बाबीनुसार न्युनतम दराचे सिलबंद दरपत्रके इच्छुक वाहनाची व्यवस्था करणा-या वाहन पुरवठादार/व्यवसाईक यांनी दि.२१/०९/२०२६ पासुन दि.२५/०९/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.१५ वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावेत.

अटी /शर्ती व दरपत्रकासोबत सादर करावयाची प्रमाणपत्र.

१. संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.
२. दिनांक.२१/०९/२०२६ पासुन दि.२५/०९/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत द्वि लिफाफा पध्दतीने सिलबंद लिफाप्यामध्ये दरपत्रके स्विकारण्यात येतील.
३. एका स्वतंत्र सिलबंद लिफाप्यामध्ये स्वयं साक्षाकिंत केलेली वैध प्रमाणपत्रे घालुन त्यावर **प्रमाणपत्रे** (तांत्रीक लिफापा)असे नमुद करावे व दुसऱ्या सिलबंद लिफाप्यामध्ये **दरपत्रके** घालुन त्यावर दरपत्रके असे नमुद करावे. दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप्यामध्ये घालुन तो सिलबंद लिफाफा कार्यालयीन वेळेत सादर करावा. टपालाने अथवा कुरियर सेवामार्फत पाठविलेली दरपत्रके विलंबाने प्राप्त झाल्यास ती उघडण्यात येणार नाहीत.

४. व्यवसाईक/संचालकाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्था/व्यवसाय नोंदणीचे अदयावत प्रमाणपत्र.

५. प्रवासी वाहतूकीचा व्यवसाय चालविण्यासाठीचा संबंधित विभागाचा अद्यावत परवाना.

६. संस्था/फर्मचे GST नोंदणी प्रमाणपत्र.

७. पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावे.

८. इच्छुक व्यवसाईक/सेवा केंद्र संचालकाने संस्थेच्या लेटरपॅडवर दरपत्रक सर्व करासह सादर करावे.

९. उपरोक्त बाबी/सेवा तपशिलासह इतर जास्तीच्या सुविधा, सवलती व सेवा पुरवणाऱ्या ज्या व्यवसाईकाचे दरपत्रके न्युनतम दराचे असेल त्यांचेच दरपत्रक मान्य करण्यात येईल.

१०. प्रवासापुर्वी कसल्याही प्रकारे अग्रिम रक्कम अदा करण्यात येणार नाही.
प्रवासाकरिता पुरवठा करणाऱ्या वाहनाचे नियमानुसार विमा काढलेला असावा.
वाहनाचे आर.सी.बुक, परमिट, फिटनेस, पी.यु.सी. अद्ययावत व वैध असणे बंधनकारक आहे.

११. प्रत्येक वाहनामध्ये किमान रु.५००/- चे रिचार्ज असलेले फास्टॅग असणे आणि जीपीएस सिस्टीम असणे अनिवार्य आहे.

१२. कार्यालयाकडून दूरध्वनी किंवा पत्राद्वारे मागणी नोंदवल्यानंतर जास्तीत जास्त १ तासाच्या आत आदेशित वाहन केंद्राच्या कार्यालयात उपस्थित होणे बंधनकारक राहील.

१३. वाहनाचे इंधन, वंगण, दुरुस्ती, नियमित देखभाल व चालक यांचा सर्व खर्च पुरवठादाराचा/वाहन मालकाचा राहील.

१४. अधिकारी/कर्मचारी यांचा कार्यक्षेत्रातील दौरा पूर्ण झाल्याशिवाय अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय वाहन सोडले जाणार नाही.

१५. चालकाचे अधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून मिळालेले वैद्यकीय शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि पोलीस पडताळणी सादर करणे बंधनकारक आहे.

१६. वाहन चालकाकडे चालू स्थितीतील मोबाईल असणे आवश्यक आहे.

१७. योग्यरीत्या स्वाक्षरी केलेले लॉगबुक आणि जीएसटी, टॅक्स इनव्हॉईस सादर केल्यानंतर नियमानुसार कर कपात (टी.डी.एस. व जी.एस.टी) करुन रक्कम अदा केली जाईल.

१८. पुरवठा करण्यात येणारे वाहन चांगल्या स्थितीतील १ जानेवारी २०२० किंवा त्यानंतरचे नवीन व सुसज्ज स्थितीत उत्तम आसन व्यवस्था, स्वच्छ असावे.

१९. वाहनचालकाचा ड्रेस पांढरा शर्ट व पॅन्ट पुरवठादाराने पुरवावी (शासकीय ड्रेसकोड) वाहनचालक मितभाषी, नम्र असावा तो धुम्रपान, मद्यपान व कुठल्याही प्रकाराचे व्यसन करणारा नसावा. तसेच उध्दट व्यवहार करीत असल्यास त्याला पुढील प्रवासा ऐवजी परत पाठविण्यात यईल. त्या वाहनाचे झालेल्या प्रवासाचे तेवढे भाडे अदा करण्यात येणार नाही.

२०. प्रवासामध्ये दुर्दैवाने वाहनाचा अपघात, वाहनचालक जखमी/जिवीत हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही. याची सर्व जबाबदारी वाहन पुरवठादार याची राहील.

२१. प्रवास पुर्ण केल्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर साधारण ७ दिवसापर्यंत देयकाची रक्कम PFMS/CMP/RTGS/NEFT (Cashless Transaction) पध्दतीनेच अदा करण्यात येईल.

२२. प्रवासामध्ये टोलनाका/पार्किंग शुल्क कंत्राटदाराने भरणा करावी. ती देयकामध्ये धरु नये.

२३. दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दि.२५/०९/२०२६ सायं. ५.१५ पर्यंत.

२४. दरपत्रके सादर करण्याची मुदत संपल्यानंतर दुस-या कामाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात खरेदी समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील. काही कारणास्तव सदरील दिवशी दरपत्रके उघडता आले नाही तर सोइस्कर दिवशी दरपत्रके उघडण्यात येतील. सदर दिवशी आपण अथवा आपले प्रतिनिधी उपस्थित राहावेत. या दिवशी आपण अथवा आपला प्रतिनिधी उपस्थित नसला तरीही दरपत्रके उघडण्यात येतील.

२५. कोणतेही कारण न देता दरकरार रदद करण्याचा अधिकार या कार्यालयाचा राहिल

२६. देयकाची अदायगी PFMS/CMP/RTGS/NEFT (Cashless Transaction) पध्दतीनेच करण्यात येणार असल्याने पुरवठादाराने आपल्या लेटरपॅडवर बॅंक खात्याची सविस्तर माहिती सादर करावी.

२७. उपरोक्त अ.क्र. १ ते २० अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेच्या लेटरपॅडवर हमीपत्र.

२८.पुरवठादार वाहन पुरवण्यास असमर्थ ठरल्यास, प्रशासनास दुसऱ्या मार्गानी वाहन भाडयाने घेण्याचा अधिकार राहील आणि होणारा अतिरिक्त खर्च मुळ पुरवठादाराच्या देयकातून कपात केला जाईल.



(डॉ.संतोष कडले)
**प्राचार्य**
**आरोग्य व कुटुंब कल्याण**
**प्रशिक्षण केंद्र, छत्रपती संभाजीनगर**

# हमीपत्र

मी/आम्ही ........................................................................ या हमी पत्राद्वारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविणा-या खरेदी प्राधिका-या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसुन हित संबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असून दुस-या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन दरपत्रक भरलेले नाही. असे आढळून आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

तसेच मी/आम्ही ............................................................ आज दि.    /    /२०२६ रोजी हमीपत्र लिहुन देतो की, **प्राचार्य,** आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद यांनी **वाहन भाडेतत्वावर** पुरवठा करण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या अ.क्र.०१ ते २८ अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत. तांत्रिक लिफाप्यामधील प्रमाणपत्रांचे शिथीलतेबाबतचे सर्व अधिकार दरपत्रके निवड समितीने राखून ठेवलेले आहेत याची जाणीव मला/आम्हाला आहे व ते मला/आम्हाला मान्य आहे. तसेच अ.क्र.०१ ते २८ अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अधीन राहून मी/आम्ही सदरील दरपत्रके सादर करीत आहे/आहोत.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ :-

दिनांक :-

दरपत्रके सादरकर्त्याची
सही व शिक्का

नाव ..........................

पत्ता .........................

टीप :- सदरील हमीपत्र सादरकर्त्याने स्वाक्षरीत करुन तांत्रिक लिफाफा क्रं.०१ मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.